दिनांक :  .०७.२०१९

प्रति,

**मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.**

**मा. शालेय शिक्षणमंत्री, महाराष्ट्र शासन, मुंबई.**

**विषय : 'बालभारती'च्या इयत्ता ७ वीच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकात महाराणा प्रताप यांचा एकेरी उल्लेख करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याविषयी ....**

महोदय,

'बालभारती'च्या इयत्ता ७ वीच्या 'इतिहास आणि नागरिकशास्त्र' या विषयाच्या पुस्तकात पृष्ठ क्र. ८ वर महाराणा प्रताप यांचा एकेरी उल्लेख करण्यात आला होता. ही चूक 'बालभारती'ने ११ जुलै या दिवशी केवळ एक शुद्धीपत्रक काढून दुरुस्त केल्याचे कळवत पुस्तकातील लिखाणात महाराणा प्रताप यांचा 'आदरार्थी' उल्लेख केला आहे. महाराणा प्रताप यांनी केलेले महान कार्य लक्षात घेता पाठपुस्तकात चुकीच्या पद्धतीने उल्लेख करून आपण आपल्या महापुरुषांचा अवमानच केला आहे. महाराणा प्रताप यांचा एकेरी उल्लेख करून केलेला अवमान हा अक्षम्य आहे. केवळ शुद्धीपत्रक काढून सुधारणा करण्याने नाही, तर संबंधितांवर कारवाई केल्यास असे प्रकार यापुढे होणार नाहीत.

यापूर्वीही वर्ष २०१६ मध्ये 'बालभारती'कडून इयत्ता ६ वीच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकात चुकीचे नकाशे प्रकाशित करण्यात आले होते. मुंबई शिक्षक संघटनेने ही चूक लक्षात आणून दिल्यानंतर ते नकाशे पालटण्यात आले होते.

*** तरी या अनुषंगाने लक्षात आलेली सूत्रे येथे देत आहोत ....**

१. पाठ्यपुस्तकातील 'शिवपूर्वकालीन महाराष्ट्र' या धड्यामध्ये विविध उपमथळ्यांखाली काही ऐतिहासिक घटनांची माहिती दिली आहे. यामध्ये 'उदयसिंहाच्या मृत्यूनंतर महाराणा प्रताप हा मेवाडच्या गादीवर आला. मेवाडच्या अस्तित्वासाठी त्याने संघर्ष चालू ठेवला. महाराणा प्रतापने अखेरपर्यंत आपले स्वातंत्र्य टिकवण्यासाठी अकबराबरोबर संघर्ष केला. पराक्रम, धैर्य, स्वाभिमान, त्याग इत्यादी गुणांमुळे तो इतिहासात अजरामर झाला आहे', असा एकेरी उल्लेख करण्यात आला होता.

२. मेवाडचा इतिहास लिहिणारा कर्नल टॉण्ड याने महाराणा प्रताप यांचा गौरव करतांना म्हटले आहे, ''प्रबळ महत्त्वाकांक्षा, शासन निपुणता आणि अपरिमित साधनसंपत्ती यांच्या जोरावर अकबराने दृढनिश्चयी, धैर्यशाली, उज्ज्वल कीर्तिमान आणि साहसी अशा प्रतापला नमवण्याचा प्रयत्न केला; पण तो निष्फळ ठरला.'' अशा महान पराक्रमी महाराणा प्रताप यांचा पाठ्यपुस्तकात करण्यात आलेला 'एकेरी' उल्लेख अक्षम्य होता.

३. हिंदुरक्षक महाराणा प्रताप नसते, तर आज हिंदु समाज अस्तित्वात नसता. महाराणा प्रताप यांच्या कार्याचा गौरव करणे तर दूरच, त्यांचा किमान इतिहास जरी शिकवला, तरी बालवयात मुलांना स्फूर्ती मिळेल; मात्र मोगलप्रेमी इतिहासतज्ञ, अधिकारी अन् शासकीय यंत्रणा यांना त्याच्याशी काहीही देणेघेणे नाही. भारतीय राष्ट्रपुरुषांचा इतिहास योग्य प्रकारे न शिकवणे, ही इतिहासाशी प्रतारणा आहे. तसेच राष्ट्राशीही एकप्रकारे द्रोह केल्यासारखे आहे. असे होत राहिले, तर भावी पिढीमध्ये राष्ट्रपुरुषांविषयीची आदरभावना नष्ट होईल.

४. यापूर्वी 'एन्सीईआर्टी'च्या पुस्तकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास काही ओळींमध्ये, तर मोगलांचा इतिहास पाने भरभरून देण्यात आला होता. महान राजे आणि राष्ट्रपुरुष यांचा तेजस्वी इतिहास दडपून परकीय आक्रमकांचा इतिहास विद्यार्थ्यांच्या माथी मारला. अशा शिक्षणाने स्वाभिमानी आणि राष्ट्रभक्त पिढी कशी निर्माण होणार ?

५. भारत हा एकमेव असा देश जगाच्या पाठीवर असेल की, जो परकीयांचा इतिहास पुस्तके भरून शिकवतो आणि स्वकीय राष्ट्रपुरुषांचा इतिहास अगदी तोकड्या शब्दांत, तेही अवमान करून शिकवतो. याची लाज 'बालभारती'सारख्या संस्थांना वाटायला हवी. आता राष्ट्रप्रेमी सरकार सत्तेत आले आहे, त्यांच्याकडून अशा इतिहासद्रोही लेखन करणाऱ्यांविरोधात कारवाई होईल, अशी अपेक्षा आहे.

६. मार्च २०१७ मध्ये वरील चूक झाल्यानंतर गेल्या २ वर्षांत बालभारतीमधील पाठ्यपुस्तकाची निर्मिती करणारे लेखक, शुद्धलेखन तज्ञ यांच्या ती लक्षात न येणे, हे लज्जास्पद आहे. यातून बालभारतीसारख्या संस्थांमधील तज्ञांच्या राष्ट्रपुरुषांविषयीच्या जाणिवा बोथट झाल्या आहेत, हेच दिसून येते. अशी मंडळी भावी पिढीला काय दिशादर्शन करणार ?

**※ या अनुषंगाने आमच्या पुढील मागण्या आहेत –**

१. महाराणा प्रताप यांचा अशाप्रकारे चुकीचा उल्लेख ज्यांच्याकडून करण्यात आला, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. अशी कारवाई करावी, जेणेकरून पुढे अशा चुका अन्य कोणाकडून होता कामा नयेत.

२. पाठ्यपुस्तकात राष्ट्रपुरुषांविषयी चुकीचा उल्लेख केल्याप्रकरणी 'बालभारती'ने हिंदु समाजाची जाहीर क्षमायाचना करावी.

आपला विश्वासू,

संपर्क :